पथकिनारवर्ती नियमात एकसूत्रता आणण्यासाठी 'इमारत रेषा' व 'नियंत्रण रेषा' याकरिता घ्यावयाची अंतरे.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शुध्दीपत्रक क्रमांक - आरबीडी - १००१/७२/रस्ते - ७.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - ७ जानेवारी, २००२.

वाचा - १) शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक-आरबीडी-१०८१/८७१/रस्ते-७, दिनांक ९ मार्च, २००१.
२) पूरकपत्र सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक-आरबीडी-१००१/७२/रस्ते-७, दिनांक २१ सप्टेंबर, २००१.

*शुध्दीपत्रक -:*

पथकिनारवर्ती नियमात एकसूत्रता आणण्यासाठी शासन निर्णय क्रमांक-आरबीडी १०८१/८७१/रस्ते-७, दिनांक ९ मार्च, २००१ अन्वये पथकिनारवर्ती नियमानुसार 'इमारत रेषा' व 'नियंत्रण रेषा' या करिता सुधारीत अंतरे लागू करण्यात आलेली आहेत. या शासन निर्णयात, पूरकपत्र क्रमांक आरबीडी/७२/रस्ते-७, दिनांक २१ सप्टेंबर, २००१ नुसार नागरी/औद्योगिक क्षेत्रात वळण रस्त्यासाठी 'इमारत रेषेचे' अंतर ४० मीटर घेण्याबाबत टीप क्रमांक ६ नव्याने अंतर्भूत करण्यात आलेली आहे. या पूरक पत्रातील टीप क्र. ६ मध्ये "राष्ट्रीय महामार्ग, प्रमुख राज्य महामार्ग व राज्य महामार्ग व याकरिता शहराबाहेरून वळण रस्ता बांधण्यात आल्यानंतर हा वळण रस्ता नगरपालिका हद्दीत / नागरी किंवा औद्योगिक क्षेत्रात येत असला तरी त्यासाठी 'इमारत रेषा' रस्त्याच्या मध्यापासुन ४० मीटर अंतरावर घेण्यात यावी" असे नमूद केले होते. त्यात बदल करण्यात येत असुन त्या ऐवजी टीप क्र.६ खालील प्रमाणे वाचण्यात यावी.

"राष्ट्रीय महामार्ग, प्रमुख राज्य महामार्ग व राज्य महामार्ग याकरिता शहराबाहेरून वळण रस्ता बांधण्यात आल्यानंतर हा वळण रस्ता नागरी / औद्योगिक किंवा अनागरी क्षेत्रात येत असला तरी त्यासाठी 'इमारत रेषा' वळण रस्त्याच्या मध्यापासुन ४० मीटर अंतरावर व 'नियंत्रण रेषा' वळण रस्त्याच्या मध्यापासुन ७५ मीटर अंतरावर घेण्यात यावी."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सं श्री. काळे)
अवर सचिव महाराष्ट्र शासन

- 8 FEB 2002

जिल्हाधिकारी कार्यालय

H-919(1000-1-02)1